**आजचे पंचांग**

दिनांक : ३१ ऑगस्ट २०२६ वार : सोमवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : तृतीया तिथी (सकाळी ०८:५० पर्यंत) त्यानंतर चतुर्थी तिथी नक्षत्र : रेवती नक्षत्र (१ सप्टेंबर पहाटे ०३:२३ पर्यंत) त्यानंतर अश्विनी नक्षत्र योग : गण्ड योग (१ सप्टेंबर रात्री ०१:५० पर्यंत) त्यानंतर वृद्धि योग करण : विस्ती (भद्रा) करण (सकाळी ०८:५० पर्यंत) त्यानंतर भाव करण

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


**'जय वैभवलक्ष्मी सहकार भूषण' पुरस्कार**

**पुणे :** सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा गौरव करणाऱ्या 'जय वैभवलक्ष्मी फाउंडेशन', पुणे यांच्या वतीने यंदाचा प्रतिष्ठेचा 'जय वैभवलक्ष्मी सहकार भूषण पुरस्कार २०२६' राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार सोहळा सोमवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर, जंगली महाराज रस्ता येथे दिमाखात पार पडणार आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३३३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### धरण तुडुंब, तरी भोरकरांची हंडाभर पाण्यासाठी वणवण; महिला संतप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र
भोर : प्रतिनिधी

भोर शहराला पाणीपुरवठा करणारे भाटघर धरण १०० टक्के भरले आहे मात्र तरीही मागील तीन महिन्यापासून भोर शहरात दिवसाआड, कमी दाबाने आणि गाळमिश्रित पाणीपुरवठा केला जात आहे. धरण उशाला कोरड घशाला अशा अवस्था भोर शहरातील नागरिकांची झाली आहे. निवडणुकीत चोवीस तास पाणी देण्याचे आश्वासन देणाऱ्यांनी तासभर तरी स्वच्छ पाणी द्या अशी मागणी शहरातील संतप्त नागरिकांनी केली आहे.

भर पावसाळ्यात धरणे तुडुंब भरली असतानाही भोर शहराला मात्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. भोर शहराला पाणीपुरवठा करणारे भाटघर धरण १०० टक्के भरले असूनही भोर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांमध्ये नगरपरिषद प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी पसरली आहे. विशेषतः महिला वर्गात संतापाचे वातावरण असून पाण्याची परिस्थिती अशी राहिल्यास नगरपालिकेवर हंडा मोर्चा काढण्याचा इशारा महिलांनी दिला आहे.

निवडणुकीच्या काळात २४ तास पाणी देऊ असे आश्वासन देणारे लोकप्रतिनिधी आता या गंभीर विषयाकडे कानाडोळा करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. पावसाळ्यातही दिवसाआड अत्यंत अनियमित पाणीपुरवठा होत आहे.कधी दिवसाआड,कधी दोन दिवसांनी तर कधी आले तरी फक्त १० ते १५ मिनिटे किंवा अर्धा तासच पाणी येते अचानक सकाळी वीज पुरवठा खंडित झाल्यास तीन दिवस पाणीपुरवठा खंडित होतो त्यातही येणारे पाणी अशुद्ध आणि गढूळ असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.


# मुस्लिम नकोत म्हणणारा हिंदू नाही' मग संघाच्या हिंदुत्वाची कसोटी नेमकी कोणती?

## मोहन भागवतांच्या न्यूयॉर्कमधील वक्तव्याने समावेशकतेचा संदेश; मात्र –आरएसएसच्या भूमिकेबाबत नव्या चर्चेला तोंड

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

: भारतात मुस्लिम नसावेत, असे कोणत्याही हिंदूला वाटत असेल तर तो हिंदूच नाही, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी न्यूयॉर्कमधील 'वन वर्ल्ड वन ह्युमॅनिटी' या कार्यक्रमात सांगितले. विविध धर्मांचे मार्ग वेगळे असले तरी मानवता एकच आहे. प्रत्येक माणसाचा सन्मान झाला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. सहअस्तित्व, धार्मिक विविधता आणि 'वसुधैव कुटुंबकम्'चा संदेश देणारे हे वक्तव्य निश्चितच महत्त्वाचे आहे. मात्र, याच वक्तव्यामुळे संघाच्या हिंदुत्वाच्या व्यापक राजकीय आणि सामाजिक मांडणीबाबत काही मूलभूत प्रश्न पुन्हा उपस्थित होतात.

संघाचे हिंदुत्व हे केवळ धार्मिक ओळख नसून सांस्कृतिक आणि राष्ट्रीय संकल्पना असल्याचे संघ परिवाराकडून सातत्याने सांगितले जाते. दुसरीकडे, भारतातील धार्मिक अल्पसंख्याक, विशेषतः मुस्लिम समाज, यांच्या संदर्भातील राजकीय चर्चेत संघाची भूमिका कायमच वादाच्या केंद्रस्थानी राहिली आहे. त्यामुळे मुस्लिमांना भारतात स्थान नाही, असे मानणारा हिंदू असू शकत नाही, हा भागवतांचा स्पष्ट संदेश स्वागतार्ह असला तरी तो संघाच्या व्यापक वैचारिक चौकटीशी सामान्य नागरिकाने कसा जोडायचा, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.




भागवत यांनी अमेरिकेतील 'प्लुरॅलिझम' आणि भारतातील 'विविधतेतील एकता' यांची तुलना केली. भारताच्या डीएनएमध्ये एकता आणि विविधता दोन्ही असल्याचे त्यांनी नमूद केले. हा विचार संविधानाच्या मूलभूत मूल्यांशीही संवाद साधणारा आहे. परंतु प्रश्न एवढाच आहे की, ही भूमिका केवळ परदेशातील व्यासपीठावर व्यक्त होणारा उदार संदेश न राहता भारतातील सामाजिक आणि राजकीय व्यवहारातही तितक्याच ताकदीने दिसणार आहे का?

धर्माच्या नावावर नागरिकांमध्ये भेदभाव होऊ नये, प्रत्येकाला समान सन्मान मिळावा आणि विविधतेचे संरक्षण व्हावे, ही भूमिका लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र अशा भूमिकेची खरी कसोटी भाषणात नसते; ती प्रत्यक्ष सामाजिक वर्तनात, संघटनांच्या सार्वजनिक भूमिकेत आणि राजकीय चर्चेच्या पातळीवर लागते.

'वसुधैव कुटुंबकम्'चा संदेश देताना भारतातील प्रत्येक नागरिक हा समान सन्मानाचा हक्कदार आहे, हेही तितक्याच स्पष्टपणे अधोरेखित करावे लागेल. मुस्लिमांविषयी द्वेषाला हिंदुत्वाशी विसंगत ठरवणारे भागवतांचे वक्तव्य त्यामुळे केवळ एका कार्यक्रमातील विधान न राहता संघाच्या विचारसरणीची प्रत्यक्ष सामाजिक कसोटी ठरू शकते. प्रश्न भागवतांच्या शब्दांवर अविश्वासाचा नाही; प्रश्न त्या शब्दांची अंमलबजावणी किती व्यापकपणे होते, हा आहे. हिंदुत्व जर मानवतेला केंद्रस्थानी मानत असेल, तर त्याची सर्वात मोठी परीक्षा बहुसंख्याकांच्या जयघोषात नव्हे, तर अल्पसंख्याकांच्या सुरक्षितता, समानता आणि सन्मानातच होईल.

# सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आधीच सेट केलाय का?'

## संजय राऊतांचा अमित शहांवर गंभीर आरोप; 'न्यायव्यवस्थेवर आमचा पूर्ण विश्वास

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाच्या आगामी निकालावरून सत्ताधारी गटातील आमदार आणि मंत्र्यांमध्ये अस्वस्थता असल्याचा दावा करत शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर रविवारी थेट निशाणा साधला. सत्ताधारी आमदार आणि मंत्री निकालाबाबत घाबरलेले असताना त्यांना 'मी सर्व पाहून घेईन' असे आश्वासन देण्यात आले. मग सर्वोच्च न्यायालयातील निकाल आधीच सेट केला आहे का? असा सवाल राऊत यांनी केला.

मुंबईतील सह्याद्री अतिथिगृहावर शनिवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अमित शहा यांची भेट झाल्याचा संदर्भ देत राऊत यांनी हा दावा केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांमध्ये आणि आमदारांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या संभाव्य निकालाबाबत अस्वस्थता असल्याचे शहा यांना सांगितले. त्यावर शहा यांनी मी सर्व पाहून घेईन, असे आश्वासन दिल्याचा दावा राऊत यांनी केला.

गेल्या महिन्यात संसदेचे अधिवेशन सुरू असताना सत्ताधारी पक्षाच्या काही खासदारांनी अमित शहा यांची भेट घेऊन न्यायालयाच्या संभाव्य निकालाबाबत चिंता व्यक्त केली होती, असेही राऊत यांनी सांगितले. त्यावेळी शहा यांनी सब सेट हो जाएगा, उसकी चिंता मत करो, मेरे पे छोड़ो, असे आश्वासन दिल्याचा दावाही त्यांनी केला.

राऊत म्हणाले की, शनिवारी झालेल्या बैठकीतही अशाच प्रकारची भाषा वापरण्यात आल्याचा दावा केला जात आहे. राहुल नार्वेकर, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्याकडून निकालाबाबत आधीच वक्तव्ये होत असल्याचे सांगत त्यांनी या संपूर्ण प्रकरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मात्र, न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास असल्याचे स्पष्ट करत राऊत म्हणाले, अधर्माच्या बाजूने सर्वोच्च न्यायालय जाणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या आसनामागे 'यतो धर्मस्ततो जयः' हे बोधवाक्य आहे. सत्ताधाऱ्यांचा पाय कितीही खोलात गेला तरी शेवटी सत्याचाच विजय होईल. 'भागवतांनी भूमिका भारतात मांडावी' दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी न्यूयॉर्कमधील कार्यक्रमात मुसलमानांचा द्वेष करणारा हिंदू असू शकत नाही, असे विधान केल्याच्या पार्श्वभूमीवरही राऊत यांनी भाष्य केले. भागवतांनी हे विधान अमेरिकेत न करता भारतात, दिल्ली आणि नागपुरात करायला हवे, असे राऊत म्हणाले. भारतात द्वेषाचे राजकारण करणाऱ्यांच्या पाठीशी संघ उभा राहणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी देशात घेऊन दाखवावी, अशी मागणीही त्यांनी केली. हिंदू धर्मात ढोंगाला स्थान नाही. त्यामुळे सरसंघचालकांनी भारतात एक आणि परदेशात दुसरी भूमिका घेऊ नये, अशी टीकाही राऊत यांनी केली. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाबाबत 'सेटिंग'चे आरोप हे राऊत यांनी केलेले राजकीय आरोप असून, त्याला पुष्टी देणारा कोणताही पुरावा या वक्तव्यात सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे आगामी न्यायालयीन निकाल आणि त्यापूर्वी होणारी राजकीय वक्तव्ये याकडे आता विशेष लक्ष लागले आहे.

# महापालिका आयुक्तांनी केली उद्यानाच्या जागेची पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे/ वृत्तसेवा

पुणे शहर उद्यानाच्या सर्वांगीण विकास करण्याच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांचे मार्गदर्शनाखाली अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) ओमप्रकाश दिवटे यांनी कै. विठाबाई पुजारी उद्यान, महर्षीनगर या उद्यानाची आज समक्ष पाहणी केली.

सदर पाहणीदरम्यान उद्यानाची सुरक्षितता, सीमा भिंती, तलावातील गाळ, नागरिकांसाठी शौचालय सुविधा, प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा, रखवालदारांसाठी निवास व्यवस्था तसेच उद्यानातील वृक्षांविषयी नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे या विविध बाबींचा आढावा घेण्यात आला. यावेळी मा. अतिरिक्त आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुढीलप्रमाणे सूचना दिल्या : उद्यानासंदर्भातील न्यायालयीन बाबींवर विधी विभाग, बांधकाम विभाग व मालमत्ता विभागाशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. नागरिकांचा अनधिकृत प्रवेश रोखण्यासाठी उद्यानाच्या सीमा भिंतीवर आवश्यक ठिकाणी कॉन्सर्टिना तार बसविण्यात यावी. उद्यानाच्या सीमा भिंतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून भिंत धोकादायक असल्यास ती पाडून त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार मजबूत काँक्रीटची भिंत उभारण्यात यावी. उद्यानातील तलावातील गाळ काढण्याचे काम येत्या उन्हाळी हंगामात नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात यावे. नागरिकांच्या सोयीसाठी उद्यानामध्ये अत्याधुनिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. पुरुष, महिला व दिव्यांग नागरिकांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

# नेपाळच्या महापुरात अडकलेले नागपूरचे १०२ भाविक सुखरूप परतले; काठमांडूमधील संकटातून महाराष्ट्रात आगमन

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नागपूर वृत्तसंस्था

नेपाळमध्ये आलेल्या भीषण अचानक पुरामुळे काठमांडूमध्ये अडकलेले नागपूरचे १०२ भाविक अखेर रविवारी, ३० ऑगस्ट रोजी सकाळी सुखरूप मायदेशी परतले. नागपूर रेल्वे स्थानकावर पोहोचल्यानंतर भाविकांनी सुटकेसाठी मदत करणाऱ्या प्रशासनाचे आणि संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले.

नागपूरमधील या भाविकांसोबत विदर्भातील इतर भागांतील चार भाविकांचाही समावेश होता. हे सर्वजण १९ ऑगस्ट २०२६ रोजी नेपाळला रवाना झाले होते. पशुपतिनाथ मंदिरासह नेपाळमधील विविध धार्मिक स्थळांना भेट देण्याचा त्यांचा उद्देश होता.

भाविकांनी काठमांडूमध्ये मुक्काम केला होता. मात्र २६ ऑगस्ट रोजी नेपाळ-तिबेट सीमेवर अचानक आलेल्या महापुराने परिस्थितीचे गांभीर्य वाढवले. पुरामुळे अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर



विध्वंस झाला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. रस्ते, पूल आणि संपर्क व्यवस्थेवर परिणाम झाल्याने विविध ठिकाणी प्रवासी आणि पर्यटक अडकून पडले.

या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर भारत आणि नेपाळमधील प्रशासनाने अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी बचावकार्य सुरू केले. त्यातून नागपूरच्या भाविकांच्या परतीचा मार्ग मोकळा झाला.

३० ऑगस्टच्या पहाटे नागपूर रेल्वे स्थानकावर पोहोचलेल्या भाविकांच्या चेहऱ्यावर सुटकेचा आनंद स्पष्ट दिसत होता. नेपाळमधील भीषण परिस्थितीतून सुरक्षित बाहेर पडल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, नेपाळमध्ये पुरामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाली असून अनेक भागांमध्ये बचाव आणि मदतकार्य अद्याप सुरू आहे. भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

नागपूरचे हे १०२ भाविक सुखरूप परतणे दिलासादायक असले, तरी नेपाळमधील आपत्तीचे गांभीर्य कायम आहे. धार्मिक यात्रेसाठी गेलेले हे भाविक संकटातून परतले; मात्र या घटनेने हिमालयीन भागातील नैसर्गिक आपत्ती आणि आपत्कालीन व्यवस्थेची आव्हाने पुन्हा अधोरेखित केली आहेत.

# क्लासेसवरील कडक नियमांना 'ब्रेक' लावणार का सरकार?

## व्यवस्थेची शिस्त की क्लासचालकांची सोय? प्रस्तावित नियमांवरून सरकारसमोर मोठा पेच

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी :

खासगी कोचिंग क्लासेसच्या नियमनासाठी शासनाने प्रस्तावित केलेल्या नियमावलीवरून राज्यात आता संघर्षाची चिन्हे दिसू लागली आहेत. नियमांमधील कठोर अटी शिथिल कराव्यात, अशी मागणी कोचिंग क्लासचालकांच्या संघटनांनी केली असून, या दबावापुढे शासन प्रस्तावित निर्णयाला स्थगिती देणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या हितासाठी नियम करायचे असतील तर ते क्लासचालकांच्या सोयीपुरते मर्यादित राहणार नाहीत, याचीही सरकारला काळजी घ्यावी लागणार आहे.

खासगी कोचिंग क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांची संख्या, शुल्क, पायाभूत सुविधा, शिक्षकांची पात्रता, सुरक्षितता आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांशी संबंधित अनेक प्रश्न वर्षानुवर्षे चर्चेत आहेत. त्यामुळे या क्षेत्रासाठी नियमावली आणण्याची गरज नाकारता येणार नाही. मात्र, प्रस्तावित मसुद्यातील काही तरतुदी व्यवहार्य नसल्याचा दावा क्लासचालकांच्या संघटनांनी केला आहे.

राज्यातील सर्व क्लासेसना सरसकट समान नियम लागू करण्याऐवजी लहान, मध्यम आणि मोठ्या क्लासेसचे वर्गीकरण करून नियम निश्चित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. शंभरपेक्षा अधिक विद्यार्थी असलेल्या क्लासेससाठीच नोंदणी बंधनकारक करावी आणि वारंवार नोंदणी करण्याऐवजी एकदाच नोंदणीची सुविधा द्यावी, अशी भूमिकाही मांडण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांसाठी आवश्यक जागेचे प्रमाण कमी करावे, अनुभवी शिक्षकांना पदवीची सक्ती करू नये, विद्यार्थ्यांनी क्लास सोडल्यानंतर उर्वरित कालावधीची फी आकारू नये, तपासणीपूर्वी संचालकांना पूर्वकल्पना द्यावी आणि नियमभंगासाठी थेट मोठा दंड न करता टप्प्याटप्प्याने कारवाई करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

यातील काही मागण्या व्यवहार्यतेच्या दृष्टीने तपासण्यासारख्या असल्या तरी प्रत्येक सवलतीचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर होणार नाही ना, हा मूलभूत प्रश्न आहे. उदाहरणार्थ, जागेचे निकष शिथिल करताना विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात येणार नाही याची खात्री कोण घेणार? शिक्षकांच्या पात्रतेचे निकष कमी करताना शिक्षणाची गुणवत्ता कशी टिकवणार? फीच्या नियमांमध्ये बदल करताना पालकांच्या आर्थिक हिताचे संरक्षण कसे होणार?

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक क्लासमध्ये रॅम्प आणि सुविधा उपलब्ध करून देणे अव्यवहार्य असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, 'व्यवहार्य नाही' म्हणून समावेशक शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांपासून माघार घेणे हा उपाय ठरू शकत नाही. प्रत्येक विद्यार्थ्याला समान शैक्षणिक संधी मिळणे ही व्यवस्थेची जबाबदारी आहे.

त्यामुळे सरकारने नियमावली घाईघाईने लागू करण्याऐवजी क्लासचालक, पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ यांच्याशी व्यापक चर्चा करणे गरजेचे आहे. ज्या तरतुदी अव्यवहार्य आहेत त्या दुरुस्त कराव्यात; पण नियमनाच्या मूळ उद्देशालाच स्थगिती देणे हा विद्यार्थ्यांच्या हिताशी तडजोडीचा मार्ग ठरू शकतो.

क्लासचालकांना सवलत हवी आहे, सरकारला नियमन करायचे आहे आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार व सुरक्षित शिक्षण हवे आहे. या तिन्हींच्या समतोलातूनच अंतिम नियमावली तयार झाली पाहिजे. सरकारने निर्णय मागे घेण्यापेक्षा त्रुटी दूर करून अधिक सक्षम आणि विद्यार्थी-केंद्रित नियम लागू करणे, हाच या वादावरचा खरा मार्ग ठरू शकतो.

# संपादकीय

## अमेरिकेत 'सर्वसमावेशक हिंदुत्व', भारतात 'ध्रुवीकरण' का?

भागवतांच्या बदललेल्या सुराचा भाजप-आरएसएसने आधी भारतात अर्थ सांगावा! मोहन भागवत अमेरिकेत गेले आणि अचानक हिंदुत्वाच्या भाषेला मानवतेची किनार आली! 'भारतात मुस्लीम नसावेत असे मानणारा व्यक्ती हिंदूच नाही', भारताच्या डीएनएमध्ये विविधता आहे, धर्माचे मार्ग वेगवेगळे असले तरी मानवता एक आहे अशी भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सरसंघचालकांनी न्यूयॉर्कच्या व्यासपीठावर मांडली. हे ऐकायला निश्चितच सुखद आहे. पण प्रश्न एवढाच आहे हा मोहन भागवत भारतात कुठे होता? अमेरिकेच्या भूमीवर सर्वसमावेशक हिंदुत्वाची भाषा आणि भारतात त्याच हिंदुत्वाच्या नावाने होणारे राजकीय ध्रुवीकरण, हा विरोधाभास आता लपून राहिलेला नाही. परदेशात भारताची प्रतिमा उदार, सहिष्णू, बहुविध आणि मानवतावादी दाखवायची आणि देशात धर्माच्या आधारावर मतांचे राजकारण करायचे, ही दुहेरी रणनीती किती दिवस चालणार? भागवतांचे अमेरिकेतील वक्तव्य ऐकून देशातील प्रत्येक सुजाण नागरिकाने आनंद व्यक्त करावा. पण त्याच वेळी एक आरसा त्यांच्या समोर धरायला हवा. कारण अमेरिकेतील मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये 'मुस्लीम नसावेत असे मानणारा हिंदूच नाही' असे सांगणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच ते भारतातील प्रत्येक राजकीय व्यासपीठावर सांगणे अधिक महत्त्वाचे आहे. न्यूयॉर्कच्या स्टेजवर सांगितलेले सत्य नागपूरच्या स्टेजवरही सांगण्याचे धाडस आहे का? कारण आरएसएस आणि भाजप यांचे परस्पर संबंध भारतीय राजकारणातील उघड गुपित आहेत. भाजप स्वतःला हिंदुत्ववादी राजकीय पक्ष मानतो, तर आरएसएस सांस्कृतिक संघटना म्हणून आपली ओळख सांगतो. मात्र राजकारणात हिंदुत्वाचा मुद्दा तापवला जातो तेव्हा संघ परिवारातील अनेक घटक सक्रिय होतात आणि निवडणूक संपल्यानंतर समावेशकतेची भाषा पुढे येते. ही वेळोवेळी बदलणारी भाषा आता जनतेच्या लक्षात येत नाही, असे समजणे हा राजकीय अहंकार ठरेल. अमेरिकेतील भागवतांचे भाषण याच कारणामुळे महत्त्वाचे आहे. जर हिंदुत्व खरोखरच सर्वसमावेशक असेल, तर त्याला मुस्लीमांविरोधातील द्वेषाची गरज काय? जर भारताच्या संस्कृतीचा पाया विविधतेत असेल, तर धार्मिक अल्पसंख्याकांच्या नागरिकत्वावर संशय घेणारी भाषा का? जर 'मानवता एक' असेल, तर धर्माच्या नावावर नागरिकांना राजकीय शत्रू बनविण्याची गरज काय? आणि जर या प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशी असतील, तर भागवतांचे अमेरिकेतील वक्तव्य भारतीय राजकारणासाठी एक मोठा आत्मपरीक्षणाचा क्षण ठरायला हवा. आरएसएसच्या शताब्दी वर्षात अमेरिकेतील हा दौरा जागतिक स्तरावर संघाची प्रतिमा आणि पोहोच वाढविण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून पाहिला जात आहे. कार्यक्रमाला 'णपर्ळींशऑरश्र जपशपर्शीी उशश्रशलॲरींळेप' असे नाव देण्यात आले होते आणि संघाच्या जागतिक विस्ताराच्या पार्श्वभूमीवर भारतीय-अमेरिकी समुदायाशी संवाद साधण्याचा उद्देशही अधोरेखित झाला आहे. मग प्रश्न असा शंभर वर्षांच्या संघप्रवासानंतर जगाला दाखविण्यासाठी एक चेहरा आणि भारतात राजकारणासाठी दुसरा चेहरा, अशी गरज का निर्माण झाली? अमेरिकेत संघावर टीका करणारे आवाजही उठले. न्यूयॉर्कचे महापौर झोहरान ममदानी यांनी या कार्यक्रमाच्या विचारसरणीवर सार्वजनिक आक्षेप घेतला; विविध धार्मिक आणि नागरी संघटनांनीही विरोध केला. या विरोधाचा भागवतांनी संवादाने सामना करणे हे स्वागतार्ह आहे. पण लोकशाहीची खरी कसोटी परदेशात विरोधकांशी संवाद साधण्यात नाही; स्वतःच्या देशातील विरोधकांना, पत्रकारांना, कार्यकर्त्यांना, अल्पसंख्याकांना आणि प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांना किती सन्मान दिला जातो यात आहे. अमेरिकेत 'संवाद' आणि भारतात 'देशद्रोह'ही दोन मापे चालणार नाहीत. अमेरिकेत 'विविधता' आणि भारतात 'बहुसंख्याकांचे वर्चस्व'ही दोन तत्त्वे एकाच वेळी खरी असू शकत नाहीत. अमेरिकेत 'मानवता' आणि भारतात 'धर्माच्या आधारे राजकीय संशय'या दोन भूमिका एकत्र नांदू शकत नाहीत. याच ठिकाणी भाजपचीही कसोटी आहे. भागवतांच्या वक्तव्याचे स्वागत करण्याचे धाडस भाजप नेतृत्व दाखवणार आहे का? पक्षातील नेते आणि प्रवक्ते भविष्यात मुस्लीम समाजाविषयी त्याच समावेशक भाषेत बोलणार आहेत का? निवडणूक प्रचारात धार्मिक ध्रुवीकरण टाळण्याची हमी देणार आहेत का? सोशल मीडिया आणि राजकीय सभांमध्ये धार्मिक द्वेष पसरविणाऱ्या आपल्या समर्थकांना थांबविणार आहेत का? की अमेरिकेतील भागवतांचे भाषण 'जागतिक प्रतिमा सुधारण्यासाठी' आणि भारतातील राजकारण नेहमीच्या ध्रुवीकरणासाठी? दुहेरी भूमिका असेल तर ती आता उघडी पडली आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान नागरिकत्व दिले आहे. त्यामुळे 'समावेशक हिंदुत्व' ही कल्पना प्रत्यक्षात आणायची असेल, तर तिची सुरुवात संविधानाच्या मूल्यांपासूनच झाली पाहिजे. मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन किंवा कोणत्याही धर्माचा नागरिक हा प्रथम भारतीय नागरिक आहे. त्याच्या देशभक्तीचे प्रमाणपत्र त्याच्या धर्माच्या नावावर देण्याची गरज नाही. भागवतांनी अमेरिकेत हेच सांगितले असेल, तर त्याचे स्वागत. पण आता पुढचा प्रश्न त्यांचाच आहे हे भारतात कधी सांगणार? देशातील राजकीय वातावरणात धर्माच्या नावावर विष पेरले जात असताना सरसंघचालकांची भूमिका केवळ अमेरिकेच्या व्यासपीठावर ऐकू येऊन चालणार नाही. ती भारताच्या संसदेत, विधानसभा निवडणुकांमध्ये, पक्षांच्या प्रचारसभांमध्ये, सामाजिक माध्यमांवर आणि सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातही दिसली पाहिजे. कारण हिंदुत्व खरोखरच 'सर्वसमावेशक' असेल, तर त्याला मुस्लीमविरोधी राजकारणाची बैसाखी लागणार नाही. आणि हिंदुत्व खरोखरच 'मानवतेचा संदेश' असेल, तर त्याला मतांच्या ध्रुवीकरणासाठी धर्माची तलवार उचलावी लागणार नाही. मोहन भागवतांनी अमेरिकेत एक चांगला संदेश दिला आहे. आता त्याची खरी परीक्षा भारतात होणार आहे.

अमेरिकेत हिंदुत्वाचा चेहरा बदलला असेल, तर भारतात त्याचे राजकरणही बदलेल का? हा प्रश्न आज विरोधकांचा नाही. हा प्रश्न प्रत्येक भारतीय नागरिकाचा आहे. देशाला भाषणातील हिंदुत्व नको आहे; देशाला आचरणातील बंधुता हवी आहे. देशाला अमेरिकेसाठी तयार केलेली समावेशकतेची प्रतिमा नको; भारताच्या मातीत रुजलेली समावेशकता हवी. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे न्यूयॉर्कमध्ये 'मुस्लीमांशिवाय भारताची कल्पना करणारा हिंदूच नाही' असे सांगणारा आवाज जर खरोखर प्रामाणिक असेल, तर तो आवाज भारतातही तितक्याच ताकदीने घुमला पाहिजे. नाहीतर इतिहास एवढेच म्हणेल परदेशात मानवतेचे भाषण आणि देशात ध्रुवीकरणाचे राजकारण; ही विचारसरणी नव्हे, ही सोयीची राजकीय भाषा आहे.

# शिवसेनेचा रोजगार मेळावा म्हणजे 'राष्ट्र उभारणीची दहीहंडी' : सचिन अहिर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

चिंचवडमध्ये ७,५०० हून अधिक युवक-युवतींची उपस्थिती; १२५ कंपन्यांकडून मुलाखतीपिंपरी, दि. ३० ऑगस्ट : प्रत्येक कुटुंबातील बेरोजगाराला रोजगार मिळाल्यास कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम होते आणि कुटुंब सक्षम झाले तरच देश विकसित होईल. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शिवसेनेचा हा रोजगार मेळावा म्हणजे राष्ट्र उभारणीची दहीहंडी आहे, असे प्रतिपादन विधान परिषद उपसभापती सचिन अहिर यांनी केले.

पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेच्या वतीने खासदार श्रीरंग बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवड येथे रविवारी (दि. ३०) भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन विधान परिषद उपसभापती सचिन अहिर यांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, महापौर रवी लांडगे, शिवसेना उपनेत्या व ज्येष्ठ नगरसेविका तथा मेळाव्याच्या संयोजक सुलभा उबाळे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते.

आजच्या तरुणांच्या चेहऱ्यावर रोजगाराबाबतचा ताण-तणाव जाणवत आहे. त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिवसेना प्रयत्नशील आहे. पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव या औद्योगिक पट्ट्यात आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे जाळे निर्माण झाले असून, येथे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. बेरोजगार युवक-युवती आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यात योग्य समन्वय साधण्याचे काम या मेळाव्यातून केले जात आहे, असे अहिर म्हणाले.

उरण व पनवेल परिसरातही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होण्यासाठी नियोजन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रोजगार मेळावे प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात आयोजित केले पाहिजेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांचे कौतुक करताना अहिर म्हणाले, बारणे यांनी दिल्लीमध्ये आपली विश्वासार्हता निर्माण केली आहे. त्यांना केंद्रात मंत्रिपद मिळावे, अशी आशा आहे. ते घेणाऱ्यांच्या पक्षात नसून देणाऱ्यांच्या पक्षात आहेत. बेरोजगार युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी ते पाठपुरावा करतील.

### ७,५०० हून अधिक युवक-युवतींची उपस्थिती

रोजगार मेळाव्यासाठी ऑनलाइन ५,५०० बेरोजगार युवक-युवतींनी नोंदणी केली होती. त्याशिवाय ऐनवेळी २,५७० जणांनी नोंदणी केल्याने मेळाव्याला एकूण ७,५०० हून अधिक युवक-युवती उपस्थित होते. विविध क्षेत्रांतील सुमारे १२५ कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

बँकिंग, आयटी, बीपीओ, केपीओ, रिअल इस्टेट, मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल आणि टेक्नॉलॉजीसह विविध क्षेत्रांतील कंपन्यांचा यात सहभाग होता. ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, टाटा मोटर्स, हुडास टेक्नॉलॉजी, विगल स्पेस, बजाज, ह्युंदाई, डॉ. रेड्डी फाउंडेशन आणि बीव्हीजी इंडिया यांसारख्या आस्थापनांच्या प्रतिनिधींनी मुलाखती घेतल्या.

पाचवी उत्तीर्ण उमेदवारांपासून आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, इंजिनिअरिंग तसेच उच्चशिक्षित उमेदवारांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

### निवड झालेल्यांना नियुक्तीपत्र

मेळाव्यात नोकरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना प्रातिनिधिक स्वरूपात सचिन अहिर आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देण्यात आली. दिव्यांग उमेदवाराला महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, राज्य सरकार मुलींच्या शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करत आहे. तसेच महिलांना आर्थिक सहाय्य देण्याचे काम सुरू आहे. देशाच्या आणि राज्याच्या विविध भागांतून नागरिक रोजगारासाठी पिंपरी-चिंचवड परिसरात येतात. त्यांच्या हाताला काम मिळावे, हा या मेळाव्यामागील उद्देश आहे. येथे सहभागी झालेल्या प्रत्येक बेरोजगाराला रोजगार मिळेपर्यंत पाठपुरावा केला जाईल.

महापौर रवी लांडगे यांनी मेळाव्याला मिळालेल्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात दर तीन महिन्यांनी विविध भागांत रोजगार मेळावे आयोजित करण्याची घोषणा केली.

संयोजक सुलभा उबाळे यांनी दिव्यांग उमेदवारांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आल्याचे सांगितले. तर शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे यांनी नोकरी न मिळालेल्या उमेदवारांना 'खासदार शिवसेना जॉब कार्ड' देण्यात येणार असून, पुढील सहा महिन्यांत त्यांना उपलब्ध रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले जाणार असल्याचे सांगितले.

यावेळी शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद उर्फ नाना भानगिरे, नगरसेवक निलेश तरस, ऐश्वर्या तरस, रेश्मा कातळे, निलेश बारणे, ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, महानगरप्रमुख राजेश फल्ले, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख सागर पाचरणे, जिल्हा समन्वयक बाळासाहेब वाल्हेकर, जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, उपजिल्हाप्रमुख खंडूशेठ चिंचवडे, महिला संघटिका शैला भोंडवे, सरिता साने, युवती संघटिका सायली साळवे आदी उपस्थित होते.

# 'तेरे कमिशनर को बुला!' हिंजवडीत मद्यधुंद कारचालकाचा हायव्होल्टेज ड्रामा

## कारला धडक देत दुभाजकावरून गाडी; पुलावर रॉंग साईडने प्रवास, पोलिसांशी हुज्जत

■ दैनिक राज्य लोकतंत्र
हिंजवडी : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणणारी घटना हिंजवडी परिसरात घडली. मद्यधुंद अवस्थेत कार चालविणाऱ्या चालकाने एका कारला धडक दिल्यानंतर दुभाजकावरून वाहन नेले. त्यानंतर हिंजवडी पुलावर चक्क रॉंग साईडने कार चालवत वाहतुकीचा खोळंबा केला. पोलिसांनी त्याला अडवून कारवाईचा प्रयत्न केला असता, संबंधित चालकाने पोलिसांशी हुज्जत घालत शिवीगाळ व दमदाटी केल्याचा आरोप आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे काही काळ घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले. संबंधित चालकाच्या वर्तनाचा व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

### 'कमिशनरला बोलवा!' म्हणत पोलिसांनाच आव्हान

वाहतूक पोलिसांनी कारवाईचा प्रयत्न केल्यानंतर चालकाने पोलिसांशीच वाद घातल्याचे व्हिडिओमध्ये दिसून येत आहे. 'कमिशनरला बोलवा!' अशा शब्दांत त्याने पोलिसांना आव्हान दिल्याचे समोर आले आहे. पोलिसांसमोरच अशा प्रकारे आक्रमक वर्तन झाल्याने कायद्याचा धाक नेमका कुठे आहे, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

एका कारला धडक देणे, दुभाजकावरून वाहन नेणे आणि पुलावर रॉंग साईडने गाडी चालविणे या प्रकारामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असल्याने मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणे हे इतर वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या जीवितासाठी गंभीर धोका ठरू शकते.

शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जात असल्याचा दावा पोलिसांकडून केला जात असताना, पोलिसांनाच जुमानत नसलेल्या या चालकाच्या प्रकारामुळे वाहतूक पोलिसांच्या कारवाईच्या प्रभावीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### कठोर कारवाईची मागणी

संबंधित चालकावर मद्यप्राशन करून वाहन चालविणे, बेदरकारपणे वाहन चालवून सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण करणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे तसेच पोलिसांशी गैरवर्तन व दमदाटी केल्याप्रकरणी कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# संघर्ष आणि साधना म्हणजे आशाताई'; श्रेया घोषाल यांचे गौरवोद्गार

## पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते २१ वा 'आशा भोसले पुरस्कार' प्रदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड,

संघर्ष आणि साधना म्हणजे आशाताई भोसले. अशा महान व्यक्तीच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी अत्यंत मोठा सन्मान आहे. लतादीदी, आशाताई, हृदयनाथजी आणि उषाताई यांची गाणी ऐकतच मी मोठी झाले. संगीतातील 'सा'देखील यांच्यामुळेच शिकले. मी स्वतःमध्ये आशाताईंचे गुण आणण्याचा प्रयत्न करते, अशा शब्दांत सुप्रसिद्ध पार्श्वगायिका श्रेया घोषाल यांनी आशा भोसले यांच्या संगीत कारकिर्दीचा गौरव केला.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा, पिंपरी-चिंचवड कलारंग प्रतिष्ठान आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावर संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल देण्यात येणारा २१ वा प्रतिष्ठित 'आशा भोसले पुरस्कार २०२६' सुप्रसिद्ध गायिका श्रेया घोषाल यांना ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शनिवारी (दि. २९) चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात भव्य सोहळ्यात हा पुरस्कार देण्यात आला.

पुरस्कारामध्ये १ लाख ११ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्हाचा समावेश होता. तसेच मानसी भोईर-घुले यांच्या हस्ते श्रेया घोषाल यांना पैठणी देऊन गौरविण्यात आले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना श्रेया घोषाल म्हणाल्या, माझे पहिले मराठी गाणे 'गणराज रंगी नाचतो' रेकॉर्ड झाले, तेव्हा मी १३ वर्षांची होते. आशाताईंची गाणी ऐकून मला कायम प्रेरणा मिळते. भाऊसाहेब भोईर यांच्या निमंत्रणाचा मी स्वीकार करते. लवकरच पिंपरी-चिंचवड शहरासाठी सांगीतिक कार्यक्रम करण्याचा प्रयत्न करेन.

### 'श्रेयाला लहानपणापासून पाहतोय'

पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी श्रेया घोषाल यांना आशीर्वाद देताना सांगितले की, श्रेयाला मी लहानपणापासून पाहत आलो आहे. षण्मुखानंद सभागृहात सर्वप्रथम तिला माझेच गाणे गाताना पाहिले. त्यावेळीच ती खूप छान गाते, असा आशीर्वाद दिला होता. यावेळी भाऊसाहेब भोईर यांनी आमदार व्हावे, अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली.




आमदार अमित गोरखे यांनी भाऊसाहेब भोईर यांचा उल्लेख पिंपरी-चिंचवड शहराचे सांस्कृतिक मंत्री असा करत, भोईर यापूर्वी भाजपमध्ये आले असते तर आज ते राज्याचे सांस्कृतिक मंत्री झाले असते. अजूनही वेळ गेलेली नाही, असे वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला.

### 'लतादीदी श्वास, आशादीदी उच्छ्वास'

स्वागत व प्रास्ताविक करताना भाऊसाहेब भोईर म्हणाले, या सांगीतिक प्रवासाचा श्वास लतादीदी आहेत, उच्छ्वास आशादीदी आणि याचे हृदय पं. हृदयनाथ मंगेशकर आहेत. लता मंगेशकर यांना देश सन्मानाने दीदी म्हणतो; त्याचप्रमाणे श्रेया घोषाल आता आमच्या 'छोटी दीदी' आहेत. श्रेया घोषाल यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये सांगीतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी वेळ द्यावा, अशी विनंती त्यांनी केली. त्याला श्रेया घोषाल यांनी हात उंचावून होकार दर्शविला.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आशा भोसले यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार म्हणजे पिंपरी-चिंचवड शहराचाही सन्मान असल्याचे सांगितले.

### 'आशा से श्रेया तक'ची सुरेल मैफल

पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर मोरया थिएटर निर्मित 'आशा से श्रेया तक' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम झाला. यामध्ये आशा भोसले आणि श्रेया घोषाल यांच्या गाजलेल्या सदाबहार गीतांची मैफल रंगली. रसिकांनी या सुरेल कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. यावेळी मानसी भोईर-घुले यांनीही गीते सादर केली. श्रेया घोषाल यांच्या हस्ते मानसी भोईर-घुले यांच्या 'मानसी रेस्कोर' या बँडचे अनावरण करण्यात आले. तसेच 'आशा भोसले पुरस्कारा'च्या गौरवशाली परंपरेची माहिती देणारी चित्रफीतही सादर करण्यात आली. सन २००२ पासून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेतर्फे हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार दिला जात आहे. यापूर्वी गानकोकिळा लता मंगेशकर, संगीतकार खय्याम, रवींद्र जैन, बप्पी लहरी, प्यारेलाल, आनंदजी, पं. हृदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर, अनु मलिक, शंकर महादेवन, पं. शिवकुमार शर्मा, सुरेश वाडकर, हरिहरन, सोनू निगम, सुनिधी चौहान, पद्मभूषण उदित नारायण, रूपकुमार राठोड, अवधूत गुप्ते, डॉ. सलील कुलकर्णी आणि शान (शांतनू मुखर्जी) यांसारख्या दिग्गजांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

कार्यक्रमास अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, आमदार अमित गोरखे, माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक योगेश बहल, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उद्योजक कृष्ण कुमार गोयल, नगरसेवक गौरव घुले, मानसी भोईर-घुले, वंदना घांगुर्डे, रुणाल सांकला, दिलीप काटकर, हर्षवर्धन भोईर, किरण येवलेकर, राजू बंग, गौरी लोंढे आदी उपस्थित होते.

# शिव महापुराण जीवांचे कल्याण करणारी कथा : ह.भ.प. अमर महाराज एकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड,

शिव महापुराण ही जीवांचे कल्याण करणारी कथा आहे. श्रवण भक्ती सर्वश्रेष्ठ आहे. भक्ती नेहमी श्रद्धेने, निष्ठेने, भावाने करावी. भक्तीचे श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सक्य आणि आत्म निवेदन असे नऊ प्रकार आहेत हे समजून घेण्यासाठी शिवपुराण कथेचे श्रवण करावे असे हभप अमर महाराज एकडे (आळंदी) यांनी सांगितले.

ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवतेज नगर चिंचवड येथील घरकुल चौकाजवळ श्री स्वामी समर्थ मंदिर येथे श्रावण मास निमित्त हभप अमर महाराज एकडे यांच्या शिवपुराण कथा वाचनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांना ज्येष्ठ नागरिक श्रीमंत पवार काका (टाळ), महेश गव्हाणे (तबला) आणि वैभव महाराज (हार्मोनियम) यांनी साथ दिली.

या कार्यक्रमाच्या आयोजनात सारिका रिकामे, स्नेहा गुणवंत, क्षमा काळे, गीता पाटील, विद्या दुदुसकर, नीलिमा भंगाळे, स्मिता शिरसाट, मंगल काळे, छाया महाजन, अश्विनी केवाडकर आणि हरिनारायण शेळके काका, राजीव गुणवंत, दीपक बिरादार, चैतन्य बनकर, मेघराज बागी, रोहन नंदनवाड यांनी आयोजनात सहभाग घेतला होता.

''मंगलम भगवान विष्णू, मंगलम गरुड ध्वज, मंगलम पुंडरी काक्षो, मंगलाय तनु हर'' या मंत्राने हभप अमर महाराज एकडे शिवपुराण कथा वाचनाचा समारोप केला. यावेळी बालगोपाळांनी शिव पुराण कथेतील ''शिवपार्वती विवाह'' आणि इतर प्रसंग सादर केले.

शिवतेज नगर चिंचवड येथील श्री स्वामी समर्थ मंदिर येथे वर्षभर विविध पारंपरिक व धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. त्याचा हजारो भक्त, भाविक लाभ घेतात अशी माहिती नारायण बहिरवाडे यांनी दिली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### शेतकऱ्यांचे हित राखणे प्राथमिकता; संघर्ष समितीसोबत प्रकल्प प्रमुखांची पुढील बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नसरापूर । प्रतिनिधी

भोंगवली परिसरातून जाणाऱ्या भोर-राजगड सबस्टेशन व टॉवर हटविण्याच्या मागणीसाठी संघर्ष समितीने केलेल्या रास्ता रोको आंदोलनाची शासनाने दखल घेतली आहे. मुंबईतील सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघर्ष समितीचे मुद्दे ऐकून प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी तपासून पर्यायी मार्ग शोधण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले, अशी माहिती संघर्ष समितीचे अध्यक्ष व माजी आमदार संग्राम थोपटे यांनी दिली.

भोंगवली परिसरातून जाणाऱ्या प्रकल्पामुळे शेतजमीन, शेती व्यवसाय व स्थानिक शेतकऱ्यांच्या जीवनमानावर गंभीर परिणाम होणार असल्याचे समितीने बैठकीत निदर्शनास आणून दिले. भोर व राजगड तालुक्यांतील विविध धरणे, महामार्ग, रिंगरोड, ग्रीन कॉरिडॉर व जुन्या टॉवर लाईनमुळे यापूर्वीच मोठ्या प्रमाणात शेतजमीन बाधित झाली असून, नव्या प्रकल्पामुळे दोन्ही तालुक्यांतील ११६ गावे प्रभावित होत असल्याचे समितीचे म्हणणे आहे.

मुख्यमंत्र्यांनी विकासासाठी विजेची गरज मान्य केली असली तरी भोर-राजगड परिसरातील शेतकऱ्यांचे हित राखणे ही प्राथमिकता असल्याचे सांगितले. प्रकल्प प्रमुखांबरोबर चर्चा करून प्रकल्पाचा पर्यायी मार्ग किंवा पर्यायी जागा शक्य आहे का, याबाबत तांत्रिक तपासणी करून योग्य तो मार्ग काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती थोपटे यांनी दिली.

# मंचर नगरपंचायतीच्या कारभाराची चौकशी; पाच सदस्यीय समिती गठीत

## कथित आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार व पदाच्या गैरवापराच्या तक्रारींची ३० दिवसांत चौकशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे। प्रतिनिधी

मंचर नगरपंचायतीच्या कारभारातील कथित आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार आणि पदाच्या गैरवापराच्या तक्रारींची आता चौकशी होणार आहे. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी पाच सदस्यीय समिती गठीत केली असून, संबंधित समितीला ३० दिवसांच्या आत स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे मंचर नगरपंचायतीच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मंचर नगरपंचायतीचे तत्कालीन प्रशासक तथा मुख्याधिकारी गोविंद जाधव यांच्या कार्यकाळातील विविध निर्णय आणि प्रशासकीय कारभाराबाबत गंभीर स्वरूपाच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. आर्थिक व्यवहार, अधिकारांचा कथित गैरवापर तसेच प्रशासकीय पातळीवरील अनियमिततेच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. आता या सर्व तक्रारींची अधिकृत पातळीवर छाननी केली जाणार आहे.





या प्रकरणी माजी सरपंच दत्ता गांजाळे आणि भगवान गांजाळे यांनी सातत्याने आवाज उठवित संबंधित कारभाराची चौकशी करण्याची मागणी केली होती. दत्ता गांजाळे यांनी केलेल्या तक्रारीची मंत्रालय स्तरावरून दखल घेण्यात आली. त्यानंतर नगरविकास विभागाने पुणे जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करून चौकशी करण्याचे निर्देश दिले.

नगरविकास विभागाच्या पत्रानंतर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पाच सदस्यीय चौकशी समिती नियुक्त केली आहे.

संबंधित समितीला प्रकरणातील कागदपत्रे, आर्थिक व्यवहार, प्रशासकीय निर्णय तसेच तक्रारींमध्ये नमूद करण्यात आलेल्या विविध मुद्द्यांची सखोल तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. चौकशी समितीचा अहवाल ३० दिवसांत सादर करायचा असून, या अहवालात प्रत्येक मुद्द्याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्याचे आदेश आहेत. त्यामुळे चौकशीत नेमके कोणते तथ्य समोर येते, कोणत्या निर्णयांमध्ये अनियमितता आढळते आणि त्यासाठी कोणाची जबाबदारी निश्चित होते, याकडे मंचर परिसराचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, चौकशीअंती आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर कोणती प्रशासकीय अथवा कायदेशीर कारवाई केली जाते, हेही महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे पाच सदस्यीय समितीच्या अहवालाकडे प्रशासकीय तसेच राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# स्वीकृत सदस्य’ पदासाठी इच्छुकांची फिल्डिंग; जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये संधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने धामणी (ता. आंबेगाव) येथील सोनवणे बंधूंच्या कुंभारवाड्यात गणेशमूर्तींना अंतिम रूप देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दिलीप सोनवणे व पोपट सोनवणे हे गणेशमूर्ती तयार करण्याचा पारंपरिक व्यवसाय जपत आहेत. सध्या मूर्तींचे रंगकाम, सजावट आणि आकर्षक रूप देण्याचा अंतिम टप्पा सुरू असून, कारागिरांची दिवसरात्र लगबग पाहायला मिळत आहे.

धामणी येथे तयार होणाऱ्या गणेशमूर्तींना आकर्षक आणि देखणे रूप देण्यासाठी मुकुट, दागिने, वस्त्रालंकार तसेच डोळ्यांची आखणी यावर विशेष भर दिला जात आहे. पारंपरिक कलाकुसरीला आधुनिक रंगसंगतीची जोड देत ग्राहकांच्या पसंतीनुसार विविध आकार, रंग आणि सजावटीच्या गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या आहेत.



गणेशमूर्ती तयार करण्याच्या या व्यवसायामुळे परिसरातील अनेक कारागिरांना हंगामी रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. गणरायाची मूर्ती साकारताना कारागीरही भक्तिभावाने कामात तल्लीन झाले असून, प्रत्येक मूर्तीला कलात्मक आणि भावपूर्ण स्वरूप देण्यासाठी विशेष मेहनत घेत आहेत.

धामणी येथे तयार केलेल्या गणेशमूर्तींना आंबेगावसह जुन्नर, खेड, शिरूर, भोसरी, शिक्रापूर आदी परिसरांतून मोठी मागणी असल्याचे दिलीप सोनवणे यांनी सांगितले. तसेच लोणी व धामणी परिसरात गणेशमूर्तींच्या विक्रीसाठी स्वतंत्र स्टॉल उभारले जात असल्याची माहिती पोपट सोनवणे यांनी दिली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कुंभारवाड्यात सुरू असलेली ही लगबग म्हणजे परंपरा, कला आणि भक्तीचा सुंदर संगम ठरत असून, गणेशभक्तांचे लक्ष या आकर्षक मूर्तींकडे वेधले जात आहे.

# पथनाट्यातून तरुणाईने मांडले डेअरी उद्योगातील वास्तव

## गाय, म्हैस आणि वासरांच्या स्थितीवर नागरिकांचे लक्ष वेधण्याचा पुण्यात उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या पार्श्वभूमीवर पुणे ॲनिमल लिबरेशनच्या तरुण प्राणी-अधिकार कार्यकर्त्यांनी रविवारी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या (एफ. सी. रोड) मुख्य प्रवेशद्वाराबाहेर पथनाट्य सादर केले. देशातील ११ शहरांमध्ये सुरू असलेल्या अभियानाचा हा एक भाग होता. सुमारे दहा मिनिटांच्या या पथनाट्यातून भारतातील डेअरी उद्योगातील नैतिक प्रश्नांसह गायी, म्हशी आणि त्यांच्या वासरांच्या स्थितीकडे नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले.

डेअरी उद्योगातील प्राण्यांशी संबंधित वास्तव आणि त्यातून निर्माण होणाऱ्या नैतिक प्रश्नांवर सार्वजनिक चर्चा व्हावी, हा या अभियानाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. पथनाट्याच्या माध्यमातून तरुणाईने हा विषय नागरिकांपर्यंत थेट आणि सहज पद्धतीने पोहोचविण्याचा प्रयत्न केला.





‘कौन बनेगा करोड़पती’शी संबंधित एका व्हायरल व्हिडिओमधील चर्चेपासून या अभियानाला प्रेरणा मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले. या व्हिडिओमध्ये अमिताभ बच्चन आणि स्पर्धक सिद्धार्थ शर्मा यांच्यात डेअरी प्राण्यांच्या परिस्थितीबाबत चर्चा झाल्याचा उल्लेख आयोजकांच्या प्रसिद्धीपत्रकात करण्यात आला आहे.

प्राणी कल्याणासोबत सार्वजनिक सुरक्षेचाही मुद्दा डेअरी उद्योगाशी संबंधित प्रश्न केवळ प्राणी कल्याणापुरते मर्यादित नसून सार्वजनिक सुरक्षितता आणि पर्यावरणाशीही संबंधित असल्याचा दावा आयोजकांनी केला. दूध देण्याची क्षमता संपल्यानंतर गायींना रस्त्यावर सोडून देण्याच्या प्रकारामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडेही यावेळी लक्ष वेधण्यात आले.

रस्त्यावर मोकाट सोडलेल्या जनावरांमुळे वाहतूक अपघातांचा धोका वाढत असून, त्यातून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे आयोजकांनी नमूद केले. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या निरीक्षणांचाही यावेळी उल्लेख करण्यात आला.

तरुणांपर्यंत हा विषय थेट आणि सहज पोहोचविण्यासाठी पथनाट्याचा मार्ग निवडला, असे कार्यक्रमाचे आयोजक प्रवीण गिरी यांनी सांगितले. तरुण अभियानकर्ते प्रांजल यांनीही डेअरी उद्योगाबाबतची चर्चा सार्वजनिक अवकाशात आणणे हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

दरम्यान, प्राणी कल्याण, नागरिकांची सुरक्षितता आणि पर्यावरणाच्या दृष्टीने अधिकाधिक वनस्पती-आधारित अन्नव्यवस्थेला प्रोत्साहन देण्याची मागणी या अभियानाच्या माध्यमातून करण्यात आली. पथनाट्याला नागरिक आणि तरुणांकडून प्रतिसाद मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

# बार्टी संशोधक विद्यार्थ्यांचा लढा तीव्र; राहुल डंबाळे उद्यापासून उपोषणाला : समाजकल्याण आयुक्तालयाला ‘टाळे ठोको’ आंदोलनाचा इशारा; फेलोशिपच्या अटी रद्द करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) फेलोशिपधारक अनुसूचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांचे आंदोलन अधिक तीव्र झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून समाजकल्याण आयुक्तालयासमोर सुरू असलेल्या आंदोलनाला अद्याप ठोस प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पक्षाचे नेते राहुल डंबाळे उद्यापासून उपोषणाला बसणार असून, आंदोलक विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी समाजकल्याण आयुक्तालयाला ‘टाळे ठोको’ आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

बार्टी फेलोशिपच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी १९ ऑगस्टपासून धरणे आंदोलन सुरू केले आहे. त्यानंतर २४ ऑगस्टपासून काही विद्यार्थी आमरण उपोषणाला बसले आहेत. मात्र, विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत शासनाकडून ठोस निर्णय होत नसल्याने आंदोलन आणखी तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाच्या २०२३ मधील कथित जाचक अटींमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व संशोधनाच्या संधींपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. फेलोशिपच्या माध्यमातून संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न असल्याने शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. ‘जोपर्यंत अटी रद्द होत नाहीत, तोपर्यंत लढा सुरूच’ विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राहुल डंबाळे स्वतः उपोषणाला बसणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. याबाबत बोलताना डंबाळे म्हणाले, सामाजिक न्याय विभागाकडे अतिरिक्त निधी उपलब्ध असतानाही हजारो कोटी रुपये इतर विभागांकडे वळविले जात आहेत. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना फेलोशिप नाकारणे हा त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा आणण्याचा प्रकार आहे. शासनाने २०२३ मधील जाचक आणि अन्यायकारक अटी रद्द करेपर्यंत हा लढा थांबणार नाही. दरम्यान, प्रशासनाच्या कथित उदासीनतेचा निषेध करण्यासाठी आंदोलक विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांकडून समाजकल्याण आयुक्तालयाला ‘टाळे ठोको’ आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तालय परिसरात तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. संशोधक विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न लक्षात घेऊन शासनाने आंदोलकांशी तातडीने चर्चा करून मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या आंदोलनात आंबेडकरी चळवळीतील संघटना, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राहुल डंबाळे आणि आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आले आहे.

# पुणेकरांच्या वर्षभराच्या गरजेइतके पाणी मुठेत; खडकवासला धरणातून आतापर्यंत १८.३८ टीएमसी पाण्याचा विसर्ग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

पुणे शहराला वर्षभरासाठी लागणाऱ्या सुमारे १८ दशलक्ष घनफूट (टीएमसी) पाण्याइतके पाणी यंदाच्या पावसाळ्यात आतापर्यंत खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीत सोडण्यात आले आहे. खडकवासला प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या जोरदार पावसामुळे धरणसाखळीतील चारही धरणे जवळपास पूर्ण क्षमतेने भरली आहेत. पाण्याची आवक कायम असल्याने विसर्ग सुरूच आहे.

खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांमध्ये मिळून २९.१३ टीएमसी म्हणजे ९९.९४ टक्के पाणीसाठा नोंदविण्यात आला. गेल्या वर्षी याच दिवशी या धरणांमध्ये २८.३९ टीएमसी म्हणजे ९७.४१ टक्के पाणीसाठा होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे ०.७४ टीएमसी अधिक पाणी उपलब्ध आहे. पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणांतून येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणानुसार धरणातून नदीपात्रात विसर्ग करावा लागत आहे. यामुळे यंदाच्या पावसाळ्यात आतापर्यंत १८.३८ टीएमसी पाणी मुठा नदीत सोडण्यात आले आहे.

खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून शनिवारी (दि.२९) ४ हजार २०८ क्युसेकने विसर्ग सुरू होता. याशिवाय नवीन मुठा उजवा कालव्यातून १,०५४ क्युसेक आणि महापालिकेसाठी ६२२ क्युसेक पाणी



सोडण्यात येत आहे. खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आतापर्यंत ७४६ मिलिमीटर पाऊस नोंदविण्यात आला आहे.

पानशेत धरण परिसरात आतापर्यंत २ हजार २६१ मिलिमीटर पाऊस झाला आहे. धरणाच्या सांडव्यावरून ९८० क्युसेक आणि वीजनिर्मितीसाठी ६०० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे.

वरसगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात हंगामात एकूण २ हजार ११२ मिलिमीटर पाऊस नोंदविण्यात आला. वरसगावच्या सांडव्यावरून १,४८८ क्युसेक, तर वीजनिर्मितीसाठी ६०० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे.

### टेमघरमध्ये सर्वाधिक पाऊस

खडकवासला प्रकल्पातील टेमघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात यंदा सर्वाधिक पाऊस झाला आहे. येथे हंगामात आतापर्यंत ३,११० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. गेल्या २४ तासांत १४ मिलिमीटर पाऊस झाला. टेमघर धरणात ३.६९ टीएमसी म्हणजे ९९.५५ टक्के पाणीसाठा असून, पाणीपातळी ७०६.४० मीटर आहे. धरणातून वीजनिर्मितीसाठी २५० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे.

शनिवारी सकाळी ६ ते सायंकाळी ५ पर्यंत चारही धरणांमध्ये मिळून २३६ दशलक्ष घनफूट पाण्याची आवक नोंदविण्यात आली. पाणलोट क्षेत्रातील पाऊस आणि धरणांमधील आवक कायम असल्याने पुढील काळात विसर्ग कमी किंवा अधिक होण्याची शक्यता पाटबंधारे विभागाने व्यक्त केली आहे.

## सारांश वृत्त

### मोदींना उझबेकिस्तानचा सर्वोच्च 'मैत्री सन्मान'; पुरस्कार भारत-उझबेकिस्तान संबंधांना समर्पित, पण परराष्ट्र धोरणाचा नेमका फायदा काय?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

ताश्कंद : प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रविवारी, ३० ऑगस्ट २०२६ रोजी, उझबेकिस्तानचा प्रतिष्ठेचा 'ओलिय दाराजाली दोस्तलिक' हा सर्वोच्च मैत्री सन्मान प्रदान करण्यात आला. उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शवकत मिर्झियोयेव यांनी ताश्कंदमधील कुकसरोय राष्ट्रपती भवनात हा सन्मान पंतप्रधान मोदी यांना प्रदान केला. मोदी यांनी हा पुरस्कार वैयक्तिक सन्मान म्हणून न स्वीकारता भारत आणि उझबेकिस्तानमधील दीर्घकाळ टिकलेल्या मैत्रीपूर्ण संबंधांना समर्पित केला. विशेष म्हणजे पुरस्काराच्या नावातील 'दोस्तलिक' या शब्दाचा संदर्भ देताना मोदी यांनी भारतातील नागरिक या शब्दाशी परिचित असल्याचे नमूद केले. 'दोस्त' म्हणजे मित्र, आणि भारत-उझबेकिस्तान संबंधांतील मैत्रीचे प्रतीक म्हणून या सन्मानाकडे पाहता येईल, असा संदेश त्यांनी दिला. पंतप्रधान मोदी सध्या दोन दिवसांच्या उझबेकिस्तान दौऱ्यावर आहेत. व्यापार, स्वच्छ ऊर्जा, संपर्क व्यवस्था आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमधील सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने हा दौरा होत आहे. मात्र अशा आंतरराष्ट्रीय सन्मानांच्या राजकीय चमकदारपलीकडे काही मूलभूत प्रश्नही उपस्थित होतात. पुरस्कार मिळणे ही निश्चितच राजनैतिक प्रतिष्ठेची बाब आहे; परंतु त्याचे भारताच्या व्यापाराला, ऊर्जा सुरक्षेला आणि मध्य आशियातील संपर्काला प्रत्यक्ष किती बळ मिळणार? हा खरा मुद्दा आहे. उझबेकिस्तान हा मध्य आशियातील महत्त्वाचा देश असून भारतासाठी या प्रदेशात आर्थिक आणि सामरिक संबंध वाढवण्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व मोठे आहे. त्यामुळे स्वच्छ ऊर्जा, व्यापार आणि संपर्क व्यवस्था या क्षेत्रांतील करार आणि सहकार्य प्रत्यक्षात किती पुढे जाते, यावर या दौऱ्याचे यश मोजले जाईल.

# नाईक तलावाच्या कंत्राटदाराची मुदत वाढवा; नागरिकांची प्रशासनाकडे मागणी

## स्वच्छता, पाण्याच्या गुणवत्तेसह स्विमिंग टँकच्या व्यवस्थापनाचे कौतुक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नागपूर/ वृत्तसंस्था

नागपूर येथील प्रसिद्ध 'सर मासाहेब श्रीमती नाईक तलाव' परिसरातील जलधारण क्षमता आणि स्विमिंग टँकच्या देखभालीचे काम करणाऱ्या सध्याच्या कंत्राटदाराची मुदत संपत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. गेल्या काही महिन्यांत स्वच्छता आणि व्यवस्थापनाची समाधानकारक व्यवस्था असल्याने सध्याचे कंत्राटदार आकाश ढेपे यांचीच मुदत वाढवावी, अशी मागणी तलावाचा वापर करणाऱ्या नागरिकांकडून प्रशासनाकडे करण्यात येत आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून आकाश ढेपे यांच्याकडे तलाव आणि स्विमिंग टँकच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या कालावधीत स्विमिंग टँकमधील पाण्याची गुणवत्ता चांगली राखण्यात आली असून, स्वच्छतेलाही प्राधान्य दिले जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तलाव आणि स्विमिंग टँकचा नियमित वापर करणाऱ्या अर्चना चव्हाण यांनी प्रशासनाकडे सध्याचे व्यवस्थापन कायम ठेवण्याची मागणी केली आहे. स्विमिंग टँकमध्ये उतरण्यापूर्वी घ्यावयाची काळजी, पाण्याच्या स्वच्छतेसंदर्भातील नियम आणि वापरकर्त्यांसाठी आवश्यक शिस्त याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

'नवा कंत्राटदार नको, सध्याचेच व्यवस्थापन कायम ठेवा'

सध्याच्या कंत्राटदाराची मुदत संपत असल्याने पुढील व्यवस्थापनाबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. नवीन कंत्राटदार नियुक्त झाल्यानंतर व्यवस्थापनाची गुणवत्ता कशी राहील, याबाबत काही नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

पूर्वीच्या कंत्राटदाराच्या तुलनेत सध्याच्या व्यवस्थापनात मोठा फरक जाणवतो. स्वच्छता, पाण्याची गुणवत्ता आणि शिस्तीच्या बाबतीत सध्याची व्यवस्था समाधानकारक आहे. त्यामुळे चांगले काम करणाऱ्या कंत्राटदाराला बदलण्याऐवजी त्याची मुदत वाढवावी, अशी मागणी पोहण्यासाठी आणि प्रशिक्षणासाठी येणाऱ्या नागरिकांनी केली आहे.



दरम्यान, नागरिकांच्या मागणीचा प्रशासनाकडून गांभीर्याने विचार करण्यात यावा आणि तलाव व स्विमिंग टँकच्या स्वच्छता व व्यवस्थापनाची गुणवत्ता कायम राहील, यासाठी योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महापुरानंतर नेपाळ अंधाराच्या उंबरठ्यावर; भारताकडे सप्टेंबरपासूनच वीज मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

विनाशकारी महापुरामुळे नेपाळच्या वीज पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाल्यानंतर काठमांडूने भारताकडे नेहमीपेक्षा लवकर वीज आयात करण्याची परवानगी मागितली आहे. नेपाळकडून साधारणपणे हिवाळ्यात भारतातून वीज आयात केली जाते. मात्र यंदा महापुरामुळे वीजनिर्मितीत मोठी तूट निर्माण झाल्याने सप्टेंबर २०२६पासूनच वीज आयात सुरू करण्यासाठी आवश्यक मंजुरी देण्यात यावी, अशी विनंती नेपाळने भारताकडे केली आहे.

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी २९ ऑगस्ट २०२६ रोजी ही माहिती दिली. एका अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, महापुरामुळे निर्माण झालेल्या वीजनिर्मितीतील तुटीचा सामना करण्यासाठी नेपाळने भारताकडे वीज आयातीसाठी आवश्यक मंजुरीची प्रक्रिया यंदा सप्टेंबरपासूनच सुरू करण्याची मागणी केली आहे. संबंधित भारतीय यंत्रणा या विनंतीवर प्रक्रिया करत असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

अलीकडील अचानक आलेल्या महापुराने नेपाळच्या अनेक भागांना मोठा फटका बसला आहे. त्रिशूली आणि ताडी नद्यांच्या संगम परिसरासह अनेक भागांमध्ये पुरामुळे मोठ्या प्रमाणावर विध्वंस झाला. वीज निर्मिती केंद्रे, प्रसारण व्यवस्था आणि इतर ऊर्जा पायाभूत सुविधांवर परिणाम झाल्याने देशाच्या वीजपुरवठ्यावर अतिरिक्त दबाव निर्माण झाला आहे.

नेपाळची भारतावरील वीज गरज प्रामुख्याने हिवाळ्यात वाढते. मात्र यंदा नैसर्गिक आपत्तीमुळे परिस्थिती वेगळी निर्माण झाली आहे. त्यामुळे हिवाळ्याची प्रतीक्षा न करता सप्टेंबरपासूनच भारताकडून वीज घेण्याची आवश्यकता नेपाळने व्यक्त केली आहे.

भारतानेही नेपाळला मदतीचा सकारात्मक संकेत दिला आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, नेपाळला आवश्यक असलेली अतिरिक्त वीज देण्यास भारत तयार आहे. त्यामुळे आपत्तीग्रस्त नेपाळच्या ऊर्जा व्यवस्थेला भारताकडून तातडीचा आधार मिळण्याची शक्यता आहे.

महापुराने केवळ नेपाळच्या जनजीवनालाच हादरा दिलेला नाही, तर देशाच्या ऊर्जा सुरक्षेसमोरही गंभीर आव्हान उभे केले आहे.

## विश्वचषक जिंकूनही सूर्यकुमारला संघाबाहेरचा धक्का! माजी कर्णधार म्हणतो 'निवड न झाल्याचे दुःख आहे'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी ।

भारताला सलग दुसऱ्यांदा पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या माजी कर्णधार सूर्यकुमार यादव याने राष्ट्रीय टी-२० संघातून वगळण्यात आल्याबद्दल निराशा व्यक्त केली आहे. विश्वचषक विजयानंतर अवघ्या काही महिन्यांतच संघातून बाहेर होण्याची वेळ आल्याने सूर्यकुमारने आपली खंत व्यक्त केली.

३५ वर्षीय सूर्यकुमारने २०२४ मध्ये भारतीय टी-२० संघाचे नेतृत्व स्वीकारले होते. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने पूर्ण झालेल्या ५० टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपैकी ४२ सामने जिंकले. त्याच्या नेतृत्वात भारताने टी-२० विश्वचषकाचे सलग दुसरे विजेतेपद पटकावत इतिहास रचला. पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद सलग दोनदा जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरला.

मात्र यशाच्या या शिखरानंतर सूर्यकुमारच्या कारकिर्दीला अनपेक्षित वळण मिळाले. मार्च २०२६ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात खेळलेला सामना हा त्याचा भारतासाठी शेवटचा टी-२० सामना ठरला. त्यानंतर त्याच्याकडून संघाचे कर्णधारपद काढून घेण्यात आले आणि श्रेयस अय्यरकडे नेतृत्व सोपवण्यात आले.

सूर्यकुमारने नेतृत्वाच्या काळात सातत्यपूर्ण कामगिरी करत भारतीय टी-२० संघाला मजबूत स्थितीत नेले होते. त्यामुळे विश्वचषक विजयानंतर काही महिन्यांतच त्याला संघातून वगळले जाणे क्रिकेटविश्वात चर्चेचा विषय ठरले आहे.

सूर्यकुमारची आकडेवारी आणि नेतृत्वातील यश लक्षात घेता, विश्वचषक विजेत्या कर्णधारालाच पुढील मालिकेत संघात स्थान का मिळाले नाही? हा प्रश्न आता भारतीय क्रिकेट व्यवस्थापनासमोर उभा राहिला आहे.

विश्वचषक जिंकूनही संघाबाहेर पडलेल्या सूर्यकुमारची ही खंत भारतीय क्रिकेटमधील निवड प्रक्रियेवर पुन्हा एकदा चर्चेला तोंड फोडणारी ठरू शकते.

## कायद्याचे विद्यापीठ कागदावरच! १५ वर्षे कायदा, ७ वर्षे पायाभरणी; उत्तराखंडच्या विद्यार्थ्यांच्या वाट्याला अजूनही 'राष्ट्रीय विधी विद्यापीठ' नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशभरातील राष्ट्रीय विधी विद्यापीठांमध्ये संस्थात्मक उत्तरदायित्वावरून विद्यार्थ्यांची आंदोलने सुरू असताना उत्तराखंडमधील शिक्षण व्यवस्थेची एक धक्कादायक वस्तुस्थिती समोर आली आहे. विधानसभेने कायदा मंजूर करून तब्बल १५ वर्षे उलटली, पायाभरणी होऊन सात वर्षे झाली, पण राष्ट्रीय विधी विद्यापीठ मात्र आजही कागदावरच आहे. ना कायमस्वरूपी परिसर, ना विद्यार्थी, ना प्रत्यक्ष शैक्षणिक कामकाज!

उत्तराखंड विधानसभेने २१ एप्रिल २०११ रोजी राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापनेसाठी कायदा मंजूर केला. मात्र त्यानंतर प्रत्यक्ष विद्यापीठ उभारण्यासाठी अपेक्षित वेगाने काम झाले नाही. अखेर १९ जून २०१८ रोजी उत्तराखंड उच्च न्यायालयाने राज्य सरकारला तीन महिन्यांत विद्यापीठ सुरू करण्याचे निर्देश दिले. कायमस्वरूपी इमारत तयार होईपर्यंत सरकारी इमारतीत किंवा भाड्याच्या जागेतून विद्यापीठ सुरू करता येईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले होते.

तरीही सरकारी यंत्रणेची गती बदलली नाही. ३ मार्च २०१९ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री त्रिवेंद्रसिंह रावत यांनी रानीपोखरी येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठाची पायाभरणी केली. त्यावेळी हे देशातील २३वे राष्ट्रीय विधी विद्यापीठ ठरणार असल्याचे सांगण्यात आले होते. सुमारे १० एकर जागा आणि २६ कोटी रुपयांच्या प्रारंभिक खर्चाचा आराखडाही चर्चेत होता.

पण सात वर्षांनंतर चित्र काय? पायाभरणीचा दगड आहे; विद्यापीठ नाही. घोषणा आहेत; वर्ग नाहीत. कायदा आहे; विद्यार्थी नाहीत.

याहून गंभीर बाब म्हणजे विद्यापीठाचे ठिकाणच वारंवार बदलत राहिले. भवालीपासून पंतनगर, रानीपोखरी आणि आता हल्द्वानीपर्यंत जागेबाबत अनिश्चितता कायम राहिली. या दरम्यान उच्च न्यायालयानेही राज्य सरकारच्या विलंबावर प्रश्न उपस्थित केले होते.

दरम्यान, शेजारील राज्यांनी मात्र पुढाकार घेतला. छत्तीसगडमध्ये राष्ट्रीय विधी विद्यापीठ २००३मध्ये, तर झारखंडमध्ये २०१०मध्ये सुरू झाले. उत्तराखंडपेक्षा उशिरा पुढे आलेल्या राज्यांनीही कायदे शिक्षणासाठी संस्थात्मक व्यवस्था उभी केली.

मग उत्तराखंडमध्ये प्रश्न फक्त निधीचा आहे का? जागेचा आहे का? की राजकीय इच्छाशक्तीचाच अभाव आहे?

कायदा करणाऱ्या सरकारांनी विद्यापीठ उभारले नाही, न्यायालयाने आदेश देऊनही काम झाले नाही आणि सात वर्षांपूर्वी पायाभरणी झाल्यानंतरही विद्यार्थी वर्गात पोहोचले नाहीत. ही केवळ एका विद्यापीठाची दिरंगाई नाही; ही शिक्षणाच्या नावावर केलेल्या घोषणांची आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेची जिवंत साक्ष आहे.

# विद्यार्थ्यांचा न्यायव्यवस्थेवर सवाल; न्यायमूर्ती भूषणांचा मोठा इशारा! ७६ वर्षे संविधानातील तरतूद कागदावरच का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशातील प्रमुख राष्ट्रीय विधी विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांकडून संस्थात्मक उत्तरदायित्व आणि न्यायव्यवस्थेच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत असतानाच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भूषण यांनी रविवारी, ३० ऑगस्ट २०२६ रोजी, सर्वोच्च न्यायालयात कायदे क्षेत्रातील विद्वान आणि नामांकित विधिज्ञांना न्यायमूर्ती म्हणून नियुक्त करण्याच्या घटनात्मक तरतुदीला प्रत्यक्षात आणण्याची गरज अधोरेखित केली.

नवी दिल्लीतील राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या २०२६च्या एलएल.एम. तुकडीच्या १३व्या दीक्षांत समारंभात बोलताना न्यायमूर्ती भूषण यांनी संविधानातील अनुच्छेद १२४(३) कडे लक्ष वेधले. या तरतुदीनुसार राष्ट्रपतींना नामांकित विधिज्ञ व्यक्तीची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्याचा घटनात्मक मार्ग उपलब्ध आहे. मात्र संविधान लागू होऊन ७६ वर्षांहून अधिक काळ उलटला तरी या तरतुदीचा एकदाही वापर झालेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

हा केवळ नियुक्तीचा प्रशासकीय प्रश्न नसून न्यायव्यवस्थेतील वैचारिक विविधतेचा मुद्दा आहे, असा संदेश त्यांच्या वक्तव्यातून स्पष्टपणे दिसून आला. कायदेविषयक संशोधन, अध्यापन आणि न्यायशास्त्राच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अनेक प्रतिभावान व्यक्तींना सर्वोच्च न्यायालयात काम करण्याची संधी मिळू शकली नाही. घटनात्मक तरतूद अस्तित्वात असूनही ती प्रत्यक्षात वापरली जात नसेल, तर तिचे अस्तित्व नेमके कशासाठी? हा प्रश्न त्यामुळे अधिक तीव्र होतो.

या वक्तव्याला सध्याच्या पार्श्वभूमीवर विशेष महत्त्व आहे. देशातील काही प्रमुख राष्ट्रीय विधी विद्यापीठांमधील विद्यार्थी संघटनांनी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या काही वक्तव्यांवर आक्षेप घेतला असून, त्यांच्या दीक्षांत समारंभातील उपस्थितीलाही विरोध केला आहे. त्यामुळे विधी शिक्षण संस्था, विद्यार्थी आणि न्यायव्यवस्था यांच्यातील संबंधांवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

एकीकडे विद्यार्थी संस्थात्मक उत्तरदायित्वाची मागणी करत आहेत, तर दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयातीलच न्यायमूर्ती घटनात्मक व्यवस्थेत अधिक व्यापक बौद्धिक सहभागाची गरज व्यक्त करत आहेत. या दोन्ही घडामोडी एकत्र पाहिल्या तर प्रश्न अधिक गंभीर बनतो.

सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश निवडण्याची प्रक्रिया पारदर्शक, विविधतापूर्ण आणि गुणवत्ताधिष्ठित करण्याची गरज वारंवार व्यक्त केली जाते. मग ७६ वर्षांपासून संविधानात असलेली 'नामांकित विधिज्ञ' नियुक्तीची तरतूद आजवर का वापरली गेली नाही?

न्यायमूर्ती भूषण यांनी उपस्थित केलेला हा प्रश्न केवळ कायदे शिक्षण क्षेत्रापुरता मर्यादित नाही. तो थेट भारतीय न्यायव्यवस्थेची रचना, न्यायाधीश नियुक्तीची प्रक्रिया आणि सर्वोच्च न्यायालयात कोणत्या प्रकारच्या कायदेविषयक विचारांना स्थान मिळते, या मूलभूत प्रश्नांना भिडणारा आहे.

# संसद संपली की सरकारचा 'खेळ' सुरू? १७ दिवसांपासून अधिवेशन जिवंत; पराभूत परिसीमन विधेयक पुन्हा आणण्याची तयारी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

संसदेचे पावसाळी अधिवेशन १३ ऑगस्ट २०२६ रोजी संपले. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांना त्या दिवशी अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले. मात्र, अधिवेशनाला अद्याप औपचारिकरीत्या समाप्त करण्यात आलेले नाही. त्यामुळे ३० ऑगस्टपर्यंत तब्बल १७ दिवस संसद तांत्रिकदृष्ट्या जिवंत ठेवण्यात आली आहे. विरोधकांच्या मते हा केवळ प्रशासकीय विलंब नसून त्यामागे काही राजकीय गणित आहे का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. विशेषतः एप्रिलमध्ये लोकसभेत पराभूत झालेले परिसीमन विधेयक पुन्हा आणण्यासाठी विशेष अधिवेशन बोलावण्याची तयारी तर सुरू नाही ना, या चर्चेला त्यामुळे उधाण आले आहे.

सामान्यतः संसदेचे अधिवेशन अनिश्चित काळासाठी तहकूब झाल्यानंतर राष्ट्रपतींकडून ते औपचारिकरीत्या समाप्त केले जाते. मात्र यावेळी १३ ऑगस्टपासून १७ दिवस उलटूनही ही प्रक्रिया झालेली नाही. त्यामुळे सरकारला नव्याने राष्ट्रपतींचे अधिवेशन बोलावण्याची स्वतंत्र प्रक्रिया न करता याच अधिवेशनाला पुन्हा बोलावण्याची तांत्रिक शक्यता कायम आहे. याच मुद्द्यावर काँग्रेसने सरकारला घेरले आहे. काँग्रेसचे माध्यम विभागप्रमुख जयराम रमेश यांनी या विलंबावर प्रश्न उपस्थित करत, अधिवेशन औपचारिकरीत्या समाप्त करण्यास होत असलेला विलंब गूढ असल्याचे सांगितले. या विलंबामुळे काही राजकीय खेळी सुरू असल्याचा संशय निर्माण होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

काँग्रेसच्या संशयामागे मुख्य कारण आहे परिसीमन आणि लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा प्रश्न. काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी २७ ऑगस्ट २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून लोकसभेची विद्यमान ५४३ जागांची संख्या पुढील १५ वर्षे कायम ठेवावी, अशी मागणी केली. त्याचबरोबर महिलांसाठी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये एक-तृतीयांश जागा राखीव ठेवण्याची तरतूद २०२९च्या लोकसभा निवडणुकीपासून लागू करावी, अशी काँग्रेसची भूमिका आहे. परिसीमनाचा प्रस्ताव संसदेत मांडण्यापूर्वी सर्वपक्षीय बैठक बोलावावी आणि राज्य सरकारांसह सर्व राजकीय पक्षांना प्रस्तावांचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा, अशी मागणीही खरगे यांनी केली आहे. या संपूर्ण वादाचा केंद्रबिंदू आहे १७ एप्रिल २०२६. त्या दिवशी लोकसभेत संविधान दुरुस्ती विधेयकाद्वारे महिलांच्या आरक्षणाच्या अंमलबजावणीशी परिसीमन जोडण्याचा प्रयत्न करणारे विधेयक मतदानाला गेले. एकूण ५२८ खासदारांनी मतदान केले. त्यापैकी २९८ खासदारांनी विधेयकाच्या बाजूने, तर २३० खासदारांनी विरोधात मतदान केले. संविधान दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या दोन-तृतीयांश म्हणजे ३५२ मतांपेक्षा ५४ मते कमी पडली आणि विधेयक लोकसभेत पराभूत झाले. आता महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, सरकारकडे हे विधेयक पुन्हा मंजूर करून घेण्यासाठी आवश्यक असलेले राजकीय बहुमत आहे का? काँग्रेसचा दावा आहे की सरकारकडे दोन-तृतीयांश बहुमत नसल्यामुळे परिसीमनाच्या मुद्द्यावर दबावाचे राजकारण केले जात आहे. काँग्रेसचे म्हणणे आहे की सरकारकडून राजकीय ताकदीचे प्रदर्शन आणि विरोधकांवर मानसिक दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दुसरीकडे, सत्ताधारी भाजपने काँग्रेसच्या आरोपांना प्रत्युत्तर देत पावसाळी अधिवेशनातील गोंधळासाठी राहुल गांधी यांच्या अहंकार आणि शिस्तभंगाला जबाबदार धरले आहे. सरकारच्या बाजूने एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, अशा प्रकारचा विलंब अभूतपूर्व नाही. २०१५च्या पावसाळी अधिवेशनानंतर संसद औपचारिकरीत्या समाप्त करण्यास २८ दिवस लागले होते. २०२१मध्येही अधिवेशन औपचारिकरीत्या समाप्त करण्यासाठी २० दिवसांचा कालावधी लागला होता. त्यामुळे केवळ १७ दिवसांचा विलंब म्हणजे विशेष अधिवेशन निश्चितच बोलावले जाणार, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

तरीही प्रश्न कायम आहेजर कोणतीही विशेष राजकीय योजना नसेल, तर संसद औपचारिकरीत्या समाप्त करण्यास एवढा विलंब का? विशेष म्हणजे उपलब्ध माहितीनुसार सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांना अद्याप राजधानीत थांबण्यास सांगण्यात आलेले नाही किंवा अचानक संसद बोलावण्याबाबत त्यांना कोणतीही सूचना देण्यात आलेली नाही. त्यामुळे विशेष अधिवेशनाबाबतची चर्चा सध्या अधिकृत निर्णयापेक्षा राजकीय संशयाच्या पातळीवर आहे. मात्र परिसीमनाचा विषय अत्यंत संवेदनशील आहे. लोकसभा मतदारसंघांची संख्या, राज्यांचे प्रतिनिधित्व, लोकसंख्येच्या आधारावर होणारे संभाव्य बदल आणि महिलांचे आरक्षणया सर्वांचा थेट परिणाम देशाच्या राजकीय सत्तासमीकरणावर होऊ शकतो. त्यामुळे संसद १७ दिवस औपचारिकरीत्या समाप्त न करण्याच्या निर्णयाकडे केवळ तांत्रिक बाब म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. सरकारकडे कोणतीही विशेष योजना नसेल, तर ती स्पष्ट का केली जात नाही? आणि काही मोठा निर्णय घ्यायचा असेल, तर त्याची तयारी इतकी गुप्त का ठेवली जात आहे? परिसीमनाच्या प्रश्नावर देशातील राजकीय वातावरण आधीच तापलेले असताना संसद औपचारिकरीत्या समाप्त न करण्याचा हा विलंब निश्चितच अनेक प्रश्न निर्माण करतो. १७ एप्रिलला पराभूत झालेले विधेयक पुन्हा आणण्यासाठी सत्ताधारी पक्ष नवी राजकीय जुळवाजुळव करीत आहे का, की हा केवळ संसदीय प्रक्रियेतील नेहमीचा विलंब आहे? याचे स्पष्ट उत्तर सरकारनेच द्यावे. कारण प्रश्न केवळ एका विधेयकाचा नाही; प्रश्न आहे लोकसभेच्या भविष्यातील रचनेचा, राज्यांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा आणि भारतीय लोकशाहीच्या सत्तासंतुलनाचा.